# <u>यवतमाळ जिल्हा परिषद, यवतमाळ</u>

(सामान्य प्रशासन विभाग)

यवतमाळ जिल्हा परिषदेची न्यायप्रविष्ट प्रकरणे चालविण्याकरीता वकील पॅनलसाठी

## <u>अटी व शर्ती</u>

जिल्हा परिषद यवतमाळचे वतीने दिवाणी व फौजदारी स्वरुपाचे कामगार / औद्योगिक / जिल्हा व सत्र न्यायालय / अप्पर आयुक्तांकडील अपील प्रकरणे तसेच मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मा.उच्च न्यायालय तसेच इतर वरिष्ठ मुख्यालयीन न्यायपिठांमध्ये जिल्हा परिषद यवतमाळने वकील पॅनलवर नियुक्त करण्यासाठी / नियुक्त केलेल्या वकीलांसाठी ठरवून दिलेल्या **अटी व शर्ती तसेच त्यानुसार वकीलांना लिहून द्यावयाचा करारनामा खालीलप्रमाणे आहे. :-**

१. ज्या वकीलांना जिल्हा परिषद यवतमाळतर्फे नियुक्ती दिली असेल त्यांना नियुक्ती दिल्याच्या आदेशाचे दिनांकापासुन यवतमाळ जिल्हा परिषदेच्या विरुध्द असलेले कोणतेही न्यायालयीन प्रकरण / दावा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे स्विकारता येणार नाही.

२. जिल्हा परिषदेचे न्यायालयीन प्रकरणे साधारणतः क्रमवारीने देण्यात येतील, तथापी एखादे प्रकरण कोणांस द्यावे याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.यवतमाळ यांचे अधिकार अंतिम राहतील.

३. यवतमाळ जिल्हा परिषदेचे नियुक्त वकील म्हणुन खालीलप्रमाणे मानधनासाठी ते पात्र राहतील. इतर कोणताही जादा खर्च मंजुर केल्या जाणार नाही.

**४. अ)** यवतमाळ येथील किंवा इतरत्र न्यायालयातील व इतर न्यायपिठातील मुळ दाव्याकरीता प्रति दावा रुपये ५,०००/- वकील फी व स्टेशनरी खर्च रु.१०००/- अशी एकत्रित जास्तीत जास्त रक्कम रुपये ६,०००/- मंजुर केल्या जाईल.

**४. ब)** मा.उच्च न्यायालयीन तसेच मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणांतील दाव्यांच्या प्रकरणी प्रति दावा रुपये ९,०००/- वकील फी व स्टेशनरी खर्च रु.१०००/- अशी एकत्रित जास्तीत जास्त रक्कम रुपये १०,०००/- मंजुर केल्या जाईल.

**४. क)** कोणत्याही प्रकरणी नियमानुसार कायदेशिर लेखी सल्ला देण्याचे शुल्क एकावेळी एका प्रकरणांत जास्तीत जास्त रुपये ५,००/- दिल्या जाईल.

**४. ड)** वकील नोटीसचे उत्तर देण्यास वकील फी व त्या अनुषंगीत किरकोळ खर्च एकुण रुपये ५,००/- जास्तीत जास्त दिल्या जाईल.

**४. इ)** उच्च न्यायालयीन व इतर न्यायालयीन तसेच इतर न्यायपिठातील प्रकरणांत ब्रीफ ड्राफ्टकरीता जास्तीत जास्त रुपये ५,००/- पर्यंत खर्च मंजुर केल्या जाईल.

**४. फ)** न्यायपिठातील प्रकरणांत caveat दाखल करणेकरीता सदर प्रकरणाला एक न्यायालयीन प्रकरण समजण्यात येईल.

४. कोणत्याही दाव्याच्या प्रकरणांमध्ये कोणत्याही परिस्थितीमध्ये खर्चासाठी अग्रीम रक्कम मिळणार नाही. वकील फी व सादील / किरकोळ खर्चाची रक्कम संबंधीत दाव्याचे अंतिम न्यायनिर्णयानंतर संबंधीत खातेप्रमुख यांचेकडून अदा केले जाईल.

५. प्रत्येक न्यायालयीन खर्चाबाबत त्याची पावती / प्रमाणपत्र देयकासोबत जोडणे आवश्यक राहील, अशी पावती पडताळणी करतांना त्यास मंजुरी देणे किंवा नाकारणे किंवा दुरुस्त करुन मंजुरी देणे याबाबतचे अधिकार संबंधीत खाते प्रमुखांना राहतील. याबाबत वाद उत्पन्न झाल्यास अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जि. प. यवतमाळ यांना राहील.

६. न्यायप्रविष्ट प्रकरणी अतिरिक्त वकीलांची नियुक्ती करणे किंवा प्रकरण कार्यवाहीत असतांना अन्य दुसऱ्या वकीलास चालविण्यास देणे किंवा प्रकरण सहमतीने आपसी करारानुसार अंतिम निकाली काढण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांना राहतील.

७. रुपये १००/- चे बंधपत्रावर विहीत अटी व शर्तीचा करारनामा संगणीकृत / टंकलिखीत करुन दिल्यानंतर बंधपत्राची कार्यवाही दहा दिवसांत पुर्ण करावी.

८. सोपविलेल्या न्यायप्रविष्ट दाव्यांचा अहवाल दरमहा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,यवतमाळ यांना पाठवावा कामकाज असमाधानकारक वाटल्यास कोणतीही पूर्वसुचना किंवा

लेखी पत्र न देता पॅनलमधुन नांव कमी करण्याचे संपूर्ण अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यवतमाळ यांना राहतील.

९. जिल्हा परिषदेचे पॅनलवरील वकीलांनी यवतमाळ जिल्हा परिषदेचे वतीने न्यायालयात तात्काळ उत्तरे दाखल करण्याची दक्षता घ्यावी. त्यांना संबंधीत विभागांकडून दस्तऐवज / माहिती वेळीच प्राप्त न झाल्यास उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य), जिल्हा परिषद, यवतमाळ यांना लेखी स्वरुपात / दुरध्वनी व्दारे तात्काळ कळविण्यात यावे.

१०. अर्ज विहीत नमुन्यात करावा.

११. करारनाम्याचा कालावधी नेमणुक दिल्याच्या आदेशाचे दिनांकापासुन ते एक वषापर्यंत बंधनकारक राहील. मुदतवाढ देण्याबाबत समिती निर्णय घेईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद, यवतमाळ करीता

सदर्हू नियुक्तीसाठी लागु असलेल्या अटी व शर्तीची मला जाणीव असुन या मला मान्य आहेत.

ठिकाण :-
दिनांक :-

वकीलाची स्वाक्षरी व पुर्ण नांव
( )

साक्षीदार क्र. १ (नांव पदनाम व स्वाक्षरी ) ----------------------------------

साक्षीदार क्र. २ (नांव पदनाम व स्वाक्षरी ) ----------------------------------